## माझ्या आठवणीतलं डेट्रॉईट

'What do you like about Detroit?' ह्या प्रश्नावर डेट्रॉईटच्या सध्याच्या, तसेच जुन्या रहिवाशांना काही लिहिण्याची विनंती करण्यात आली आणि मी जुनी डेट्रॉईटकर असल्याने कागद व पेन घेऊन बसले. खरं तर 'What do you like about Detroit?' ह्या प्रश्नाला माझ्याकडे तसं सुबक सुटसुटीत उत्तर नाही. कारण डेट्रॉईट हे अमेरिकेतल्या इतर काही शहरांपैकीच एक शहर. तेव्हा त्यात इतर शहरांपेक्षा जास्त काही खास नवीन निराळं असं आवडण्यासारखं (किंवा नावडण्यासारखं) विशेष काही नाही असं मला वाटतं. पण असं असूनही आज डेट्रॉईट सोडून २५ वर्षे झाली तरी सुध्दा कधीही कुठे डेट्रॉईटचा उल्लेख झाला किंवा दूरदर्शन/इंटरनेटवर डेट्रॉईट बद्दल बातमी दिसली की माझं लक्ष वेधलं जातं. त्याला कारणही तसंच आहे.

१९७५ साली आम्ही भारतातून प्रथम अमेरिकेला आलो ते डेट्रॉईटला. ऐन हिवाळ्यात १२ डिसेंबर रोजी पूर्णपणे बर्फाने आच्छादलेल्या विमानतळावर मी उतरले. विमानतळावरुन बाहेर येताच बेफाम थंडी तर जाणवलीच, पण त्यासोबत ह्या नवीन देशात सर्व काही नव्याने सुरु करण्याचा विचार, भिती, कुतुहल, उत्साह, काळजी, माहेरची माणसं सोडून आल्याचं दु:ख, नवरा भेटल्याचा आनंद अशा मिश्र भावनांचा मनात कल्लोळ उठला. नव्या नवलाईच्या त्या विश्वात संसार सुरु करताना पहिलं अपार्टमेंट, पहिली नोकरी, पहिली गाडी, पॅरलल पार्किंगमुळे नापास झालेली पहिली ड्रॉईव्हींग टेस्ट, पहिलं बाळंतपण, पहिलं घर असं सगळंच पहिलं वहिलं डेट्रॉईटने दिलं. तेव्हा डेट्रॉईटला मोजकीच मराठी मंडळी होती. आम्ही सर्वांनी मिळून सुरू केलेलं ‘डेट्रॉईट मराठी मंडळ’ त्याबरोबर गणपती, दिवाळी नाटकं इत्यादीं ची गोड सुरवात डेट्रॉईटपासून झाली.

अमेरिकेत आल्या आल्या बँकेत चेक भरण्यापासून स्वयंपाकघरात डाळ फोडणीला टाकण्यापर्यंतचे सगळेच अनुभव नवीन होते. पूर्वी भारतात कधी न कराव्या लागलेल्या गोष्टी अमेरिकेत शिकताना, शिकवतांना मित्रमैत्रिणींचा आधार, सोबत खूप मोलाची ठरली. त्याकाळात भारतातून आई/सासू झट्कन् विमानात बसून पट्कन् इथे लेकी/सुनेच्या बाळंतपणाला येणे शक्य नसे. त्यामुळे अशावेळी आम्ही मैत्रिणींनीच एकमेकींना मदत केली.

थोडक्यात ‘कोवळ्या’वयात अमेरिकेला आल्यानंतरची ती पहिली काही वर्ष, मित्रमैत्रिणींबरोबर अनुभवलेले लहान मोठे पेचप्रसंग/अडीअडचणी, आणि त्यावर केलेली मात अशा सगळ्या पहिल्या वहिल्या आठवणी डेट्रॉईट शहराशी निगडीत आहेत. आणि म्हणूनच माझ्या हृदयात डेट्रॉईटविषयी एक खास स्थान आहे.

**शकुन पानसे** (न्यू जर्सी )

## डेट्रॉईट आणि मी

डेट्रॉईट सोडून मला १० वर्षे झाली. पण डेट्रॉईट महाराष्ट्र मंडळाची मी कायमची ऋणी आहे. कारण या मंडळाने मला माझ्यातल्या लेखिकेशी, निवेदिकेशी, दिग्दर्शिकेशी तर ओळख करून दिलीच पण माझ्यातली अभिनेत्रीसुद्धा जागी केली. डॉ. सुभाष केळकरांनी बसविलेल्या ‘जावई माझा भला’ या नाटकात काम करण्याची प्रथम संधी मिळाली. अशोक देशपांडे यांच्या प्रोत्साहनामुळे मी गाण्याच्या कार्यक्रमाचे पहिले निवेदन डेट्रॉईटमधे केले. डॉ. सुरेश बिलोलीकर, डॉ. देवदत्त कुलकर्णी यांच्या आग्रहामुळे मी स्थानिक वृत्तात लिहायला लागले. मी पहिलं नाटक लिहिलं, पहिली एकांकिका बसविली, पहिल्यांदा स्टॅन्ड अप कॉमेडी केली ती सुद्धा डेट्रॉईटलाच.

**मधुरा गोखले** (डेनव्हर, कोलोराडो)

***